कळवण्यास आनंद होतो की, ‘कोची बिनाले फाउंडेशन’ यंदा चौथ्यांदा, कलाविद्यार्थ्यांसाठी ‘स्टुडंट्स बिनाले’ आयोजित करत आहे.

‘स्टुडंट्स बिनाले’ हा कोची बिनाले फाउंडेशनचा देशव्यापी आणि सर्वात मोठा शैक्षणिक उपक्रम असतो. महाराष्ट्रातील आणि देशातील कलाशिक्षण संस्थांना पूरक कार्य करावे आणि कलाशिक्षणाला बळकटी द्यावी, असा उद्देश त्यामागे आहे. दर दोन वर्षांनी कोची शहरात ‘कोची बिनाले’ भरते, तशीच ‘स्टुडंट्स बिनाले’देखील भरते. यंदा परिस्थिती निराळी आहे, कारण महासाथीचे आव्हान आपल्यापुढे आहे. तरीही ‘स्टुडंट्स बिनाले’ होणारच आणि यंदा जास्तीत जास्त कलाशिक्षण संस्था तसेच विद्यार्थ्यांचा सहभाग त्यात असणारच, अशी उमेद आम्हाला वाटते.
प्रदर्शनाइतकीच त्याची उभारणीही महत्त्वाची मानणारा हा उपक्रम आहे. त्यामुळे ‘ऑनलाइन प्रदर्शन’ असे यंदाच्या उपक्रमाचे स्वरूप जरी असले तरी त्याआधीच्या कार्यशाळा, चर्चा, गाठीभेटी हे उपक्रम यंदाही घडावेत, असा आमचा प्रयत्न राहील. कलाशिक्षण संस्था आणि विद्यार्थी यांचीही परिस्थिती त्यातून उमगेल, संवाद घडेल.
यासाठी स्वत: चित्रकार आणि कलाशिक्षणाचा दीर्घ अनुभव असलेले असे पाच नियोजक किंवा क्युरेटर यंदा कोची बिनाले फाउंडेशनला मदत करतील. या सर्वांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदाच कलाविद्यार्थ्यांना होणार आहे.
आता मुद्द्याच्या गोष्टी नमूद करू.

## यंदा स्टुडंट्स बिनालेचे क्युरेटर कोण?

अदीप दत्ता, अर्चना हंडे, मनोज वायलूर, सुरेश के. नायर आणि वसुधा थळूर.

## स्टुडंट्स बिनाले नक्की कशी असणार?

‘कोविड-१९’ महासाथीमुळे, स्टुडंट्स बिनाले यंदा ऑनलाइन असेल.
यात प्रदर्शनाप्रमाणेच, कार्यशाळांचाही समावेश असेल. हे संवादही ऑनलाइन होतील.

## कोण सहभागी होऊ शकतं?

भारतातल्या कुठल्याही कलाशिक्षण संस्थेत, दृश्यकलेच्या कोणत्याही शाखेची पदवी (किंवा समकक्ष) तसेच पदव्युत्तर पदवी (किंवा समकक्ष) घेण्यासाठी शिकत असलेले विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात.

## सहभाग कसा आणि कशासाठी?

क्युरेटरांचे पथक देशभराच्या कानाकोपऱ्यांतील, लहान संस्थांनाही प्रतिनिधित्व मिळावे असा प्रयत्न करील. पण अंतिम निवड ही या क्युरेटरांची राहील. प्रदर्शनासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना, त्यांचे कला-प्रकल्प साकार करण्यासाठी ‘प्रॉडक्शन ग्रँट’ म्हणून काहीएक रक्कम दिली जाईल.
अशा रीतीने विकसित झालेले कला-प्रकल्प (चित्रे, शिल्प, मांडणशिल्प किंवा इन्स्टॉलेशन, ध्वनिशिल्प, व्हीडिओ आदी) डिजिटल स्वरूपात, ऑनलाइन प्रदर्शनात असतील. या प्रदर्शनासाठी डिजिटलच कलाकृती हव्यात असे नाही... कोणत्याही कलाकृती, पण प्रदर्शन डिजिटल असेल.

### म्हणजे काहीजण वगळले जाणार?

प्रदर्शनासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना अधिक मार्गदर्शन मिळेल, ग्रँटही थोडीफार मिळेल हे खरे; पण त्याशिवाय काही कार्यशाळा त्याच संस्थेतील अन्य विद्यार्थ्यांसाठी सुद्धा आयोजित करण्याचा प्रयत्न राहील. या कार्यशाळांमध्ये क्युरेटर तसेच अतिथी कलावंतांचे मार्गदर्शन मिळेल.

### तारखा काय? अंतिम मुदत कधी?

‘स्टुडंट्स बिनाले’ हे प्रदर्शन २१ फेब्रुवारी २०२० रोजी सुरू होईल.
पण त्यासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ नोव्हेंबर २०२० ही आहे.
निवडलेल्या सहभागी विद्यार्थ्यांची यादी ०१ डिसेंबर २०२० रोजी जाहीर होईल.

### अर्ज कसा करायचा?

अर्ज ऑनलाइन करण्याची सोय आहे.
तो कसा करायचा, हे जाणून घेण्यासाठी
**इथे क्लिक करा :** http://www.kochimuzirisbiennale.org/sbapplications/
**For help :** http://www.kochimuzirisbiennale.org/sbhelp/

### अर्ज पाठवायचा कुठे?

studentsbiennale@kochimuzirisbiennale.org
या ईमेलवर अर्ज पाठवावा. कलाशिक्षण संस्थांना काही शंका असतील, तर याच ईमेलवर संपर्क साधावा.
मात्र लक्षात ठेवा,
१५ नोव्हेंबर २०२० च्या संध्याकाळी पाच पर्यंतच आलेल्या अर्जांचा विचार केला जाईल.